अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# दिल्लीतली सत्ता टिकवण्यासाठी युपीएचा दांडिया रास

सध्या नवरात्र सुरू आहे. देवीची भक्ती करण्यासाठी देशाच्या अनेक भागांत दांडिया रास किंवा गरबा सुरू आहे. तसाच दिल्लीतही 'सत्तादेवी'च्या आराधनेसाठी राजकारण्यांचा दांडियाही जोरात आहे, फक्त फरक एवढाच असतो राजकारणातला दांडिया म्हणजे एकमेकांच्या दांड्या उडवणे आणि पुन्हा सत्तेच्या खुर्चीभोवती फिरत राहणे. असे त्याचे स्वरूप असते. सत्तेची खुर्ची आपल्याच ताब्यात राहावी याकरिता युपीएमधले घटकपक्ष असाच दांडिया रास खेळत आहेत. नवरात्रापूर्वीच तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी आपला दुर्गावतार दाखवला आणि मनमोहन सिंग सरकारची पहिली दांडी उडवली. पश्चिम बंगालमध्ये तर दुर्गोत्सव फार मोठ्या उत्साहात साजरा होतो. आपले वर्चस्व सिध्द झाले आहे असे लक्षात येताच पश्चिम बंगालमधल्या या ममता बॅनर्जींनी दिल्लीकरांना दुर्गोत्सव काय असतो याची झलक दाखवून दिली. यापाठोपाठ मायावती यांनी अशाच सत्तेचा 'मायावतार' दाखवून दिल्लीकरांची सत्ता केव्हाही डळमळीत होऊ शकते याचा इशारा दिला. या सगळ्या अधांतरी परिस्थितीत आपली सत्तादेवी आपल्यावर प्रसन्न व्हावी यासाठी सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग यांची धावपळ सुरू झालेली दिसते. येणाऱ्या लोकसभा निवडणुकांकरिता आतापासूनच डावपेच आखले पाहिजेत आणि नवा दांडिया रास खेळून खुर्चीभोवती फेर धरला पाहिजे असे या दोघांना वाटू लागलेले दिसते. कदाचित यासाठीच त्यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल करण्याचे ठरवले असावे. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांची या दोघांनी भेट घेऊन मंत्रिमंडळ बदलाविषयी चर्चा केली. प्रणव मुखर्जी हे जरी राष्ट्रपती असले तरी ते काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत आणि म्हणून राष्ट्रपती भवन हे आता काँग्रेससाठी काही राजकीय खलबते करण्यासाठीसुध्दा हक्काचे आणि मोक्याचे ठिकाण झाले आहे. बऱ्याच वेळेला तर मनमोहन सिंग किंवा सोनिया गांधी यांच्या लक्षातही येणार नाहीत अशा गोष्टी प्रणव मुखर्जी सांगत असतील. या उद्देशानेच सोनिया गांधींनी प्रणव मुखर्जींची भेट घेऊन नव्या सीमोल्लंघनाची तयारी सुरू केली आहे. ममता बॅनर्जी यांनी पाठिंबा काढल्यानंतर मंत्रिमंडळातल्या दोन जागा रिकाम्या झाल्या. विलासराव देशमुख यांच्या निधनानंतर ती जागा देखील अजून रिक्त आहे. तर राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत पी. ए. संगमा यांनी आपली उमेदवारी दाखल केली आणि राष्ट्रवादी काँग्रेसला राम राम ठोकला. त्यांची कन्या अगाथा संगमा हिलाही आता वगळून त्याठिकाणी अन्य कोणाची तरी सोय केली जाऊ शकते. भाजपाचे अध्यक्ष नितीन गडकरी यांच्याविषयी भरपूर माहिती असलेला नागपूरचाच राजकारणी निवडून त्याला केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले जाण्याचीही चर्चा सुरू झाली आहे. अशा अनेक प्रकारच्या व्यूहरचनेतून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलाचे संकेत मिळत आहेत.

## आता नागपूरला केंद्रीय मंत्रीपद

एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसून येते, युपीए सरकारवर अनेक प्रकारचे आरोप आणि टीका होत असूनही ते त्यातून तावून सुलाखून बाहेर पडताना दिसते. राजकारणात सत्ता टिकवणे हा एकच उद्देश असतो. खुर्चीसाठी वाट्टेल तो खर्च करण्याची राजकारण्यांची तयारी असते. एवढे मोठे एकामागोमाग घोटाळे बाहेर पडूनही युपीएवर किंवा काँग्रेसवर त्याचा काही परिणाम झाला नाही. या सगळ्या मुद्द्यांकडे सामान्य जनतेचे दुर्लक्ष व्हावे, असे राजकीय डावपेच खेळले गेले. थेट परदेशी गुंतवणुकीचा निर्णय आणि सहा सिलिंडरऐवजी जादा किमतीने नऊ सिलिंडर देण्याचा निर्णय घेऊन सगळ्यांनाच संभ्रमात टाकण्याचा उद्योग युपीए सरकारने केला. त्यामुळे समाजाचे किंवा देशाचे काय नुकसान होत आहे, याच्याशी राजकारण्यांना काही घेणे-देणे नाही. या निर्णयांमुळे सामान्य जनता किती भरडून निघणार आहे, महागाईच्या वणव्यात ती होरपळणार आहे याची जराशीदेखील खंत मनमोहन सिंग यांच्या चेहऱ्यावर दिसून येत नाही. सतत सत्तेचा विचार करीत राहिल्यामुळे सामान्यांचे हित जणुकाही कालबाह्य झाल्यासारखेच वर्तन राजकारण्यांमध्ये दिसून येते. आतादेखील रॉबर्ट वढेरा या सोनिया गांधींच्या जावयाने सरकारला अडचणीत आणणारे उपद्व्याप केले. 'डीएलएफ' कंपनीकडून वढेरा यांना भरपूर आर्थिक मदत झाल्याचे आरोप झाले. आता या मुद्द्याकडे लोकांचे दुर्लक्ष व्हावे आणि विरोधी पक्षांनाही नव्या गोंधळात टाकावे या उद्देशाने मंत्रिमंडळाच्या फेरबदलाचा खेळ खेळला जाईल. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपाला आणखी 'जायबंदी' कसे करता येईल असे डाव आखले जात आहेत. या पक्षाचे अध्यक्ष नितीन गडकरी यांचे माहेरघर असलेल्या नागपूरमध्येच त्यांना रोखून धरणारी व्यूहरचना तयार होत आहे. गडकरी यांना अडचणीत आणणाऱ्या नेत्याला मंत्रिमंडळात स्थान दिले जाईल. आज गडकरी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्यामुळे नागपूर ही जणुकाही त्यांची राजधानी झाल्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. त्याला शह देण्यासाठीच नागपूरच्या काँग्रेस नेत्याला मंत्रिमंडळात स्थान मिळेल आणि गडकरींना आव्हान देण्याचा प्रयत्न होईल.

## राहुल गांधींवर नवी जबाबदारी

मंत्रिमंडळाची फेररचना करण्याशिवाय तसा काँग्रेसला पर्यायही नाही. कारण आगामी गुजरात विधानसभा निवडणूक, महागाईचा मुद्दा आणि भ्रष्टाचाराचा आगडोंब यातून बाहेर पडायचे असेल आणि आपले घर ठाकठीक करायचे असेल तर काँग्रेसला फेरबदलाचा डाव खेळणे आवश्यकच होते. या फेरबदलामध्ये काही नवे चेहरे जरी मंत्रिमंडळात येणार असतील तरी काही जुन्यांना वगळले जाऊ शकते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे यानिमित्ताने काँग्रेसच्या पक्षांतर्गत संघटनात्मक बदलालाही चालना दिली जाऊ शकते. निवडणुकीपूर्वी नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, त्यांच्यात उत्साह निर्माण व्हावा असाही या फेरबदलामागचा उद्देश असू शकेल. कदाचित या संघटनात्मक फेरबदलामध्ये राहुल गांधी यांच्याकडे पुन्हा मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते. या राजपुत्राच्या स्वागतासाठी नवरात्र किंवा विजयादशमीचाच मुहूर्त काँग्रेसनेच निवडला असावा, नाहीतरी पूर्वीच्या काळी राजे महाराजे पराक्रमासाठी निघताना विजयादशमीचाच मुहूर्त निवडत असत. आता या राजपुत्राकरितासुध्दा असाच हा मुहूर्त साधायचे असे ठरवले असावे. जावयावर आरोप झाल्यामुळे अडचणीत सापडलेली काँग्रेस राहुल गांधींच्या नव्या भूमिकेमुळे थोडीफार सावरली जाऊ शकते. कार्यकर्त्यांमध्ये थोडाफार उत्साह निर्माण करू शकेल. ज्या ज्या वेळेला काँग्रेस किंवा युपीए सरकार अडचणीत आले त्या त्यावेळेला मनमोहन सिंग यांनी एकतर वादग्रस्त निर्णय घेतले किंवा राजकीय हालचाली घडवून विरोधी पक्षांचे आणि लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवले. आतादेखील मंत्रिमंडळ फेरबदलामागचा असाच डावपेच असावा, असे अनेकांना वाटू लागते.